**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**बृहत आराखडा - शिक्षण पध्दतीतील अविभाग्य भाग - कुलगुरू**
**विद्यापीठात बृहत आराखडा कार्यान्वय समिती कार्यशाळा संपन्न**

अमरावती.

बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्रचंड परिश्रम विद्यापीठस्तरावर घेतल्यामुळे परिपूर्ण असा तयार करता आला, त्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली असून तो शिक्षण पध्दतीतील अविभाज्य भाग असल्याचे अध्यक्षीय संबोधन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने वार्षिक २०१९-२०, पंचवार्षिक २०१९ ते २४ बृहत आराखडा कार्यान्वय समिती कार्यशाळेचे आयोजन दृकश्राव्य सभागृहात संपन्न झाले. त्यावेळी कुलगुरू अध्यस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक कळंबे, आय.आय.एल. चे संचालक डॉ. डी.टी. इंगोले, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा डॉ.एफ.सी. रघुवंशी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा डॉ.डी.डब्ल्यू. निचित, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा डॉ. मनिषा काळे आणि उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, पहिल्यांदाच अशा प्रकारचा बृहत आराखडा संपूर्ण महाराष्ट्रासाठी तयार झाला. गुणवत्तापूर्ण असा आराखडा असून नवीन विद्यापीठ कायद्यावर तो आधारित आहे. शिक्षणक्षेत्रात अनेक महत्वपूर्ण बदल होत आहे, त्या बदलाच्या आधारावर आराखडा तयार झाला आहे, आता अंमलबजावणी महत्वाची असून ती परिपूर्ण व्हावी, त्याचा विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त फायदा व्हावा, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. अशोक कळंबे म्हणाले, शासन नॅकबाबत कठोर असून वारंवार यावर विचारमंथन व चर्चा होत आहे. चाळीस टक्के पदे भरण्याची परवानगी शासनाने दिलेली आहे. २०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित वर्कलोडला शासनाने मंजुरात दिली असून त्यानुसार दोन महिन्याच्या आत पदभरती अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाद्वारे बिंदू नामावली अभियान १४ जानेवारी पासून राबविल्या जात आहे.

प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी बृहत आराखड्या संदर्भात माहिती दिली. यासाठी मोठ्या प्रमाणावर समाजातील विविध घटकांचा सर्व्हे करण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता वाढीसाठी बृहत आराखड्यात भर देण्यात आला असून नॅक दर्जा आणि राष्ट्रीय मानांकन वाढविण्यासाठी महत्वपूर्ण ठरला आहे.

विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या उद्‌घाटन कार्यक्रमात कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, हार्रापण करण्यात आले. प्रास्ताविक भाषण कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले. संचालन महाविद्यालय विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केले. याप्रसंगी आय.आय.एल. संचालक डॉ.डी.टी. इंगोले, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख, गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. मनिषा काळे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, रासेयोचे संचालक डॉ. राजेश बुरंगे, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. एस.एफ.आर. खाद्री यांनी पी.पी.टी. द्वारे माहिती दिली. यावेळी विविध मान्यवरांनी प्रश्न विचारुन माहिती जाणून घेतली. याप्रसंगी विविध विभाग प्रमुख, महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते, सहाय्यक कुलसचिव डॉ. रामसिंह येवतीकर, मिलींद चेपे, राजेश सवाई, संजय ठाकूर, सुरेश साखरकर, धंदर, एस.पी. तायडे, एस.पी. वाडिवा, भरत ठाकूर, रोहित देशमुख, आशिष ठाकूर, ए.पी. सरोदे, सौ.बी.बी. बेलोरे, सौ. भारती जाधव, कु. निता झुंजारे, सौ.व्ही.आर. देशमुख यांनी कार्यशाळा आयोजनासाठी अथक परिश्रम घेतले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ११/०१/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी